# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ११/०७/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### अवैधरीत्या विदेशी दारुची वाहतुक करणारा आरोपी अटक

दिनांक ०९/०७/२०२२ रोजी सावनेर पोलीस स्टाफ पो.स्टे. सावनेर परिसरात पेट्रोलिंग करित असतांना पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, बाजार चौक सावनेर येथुन एक इसम आपल्या ताब्यातील एक मोटरसायकल हिरो डिलक्स गाडीवर एका पिश्वीत विदेशी दारूच्या निपा वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सावनेर पोलीसांनी बाजार चौकात नाकाबंदी केली असता दिनांक ०९/०७/२०२२ चे २०.०० ते २०.३० वा. सुमारास एमएच–४०/सीजी–९५८२ क्रमांकाची हिरो एचएफ डिलक्स मोटरसायकल येतांना दिसली. सदर मोटरसायकला थांबवुन पाहणी केली असता आरोपी नामे– चन्द्रशेखर भाउराव मोरे, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. १२ सावनेर याने एका पिश्वीचे आत अवैधरित्या १० निपा विदेशी दारू एम्पेरीयल ब्लु प्रतेकी १८० एमएल प्रमाणे किमंत १,५००/– रू. चा माल वाहतुक करतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन एक एमएच–४०/सीजी–९५८२ क्रमांकाची हिरो एचएफ डिलक्स मोटरसायकल कि. ६०,०००/–रू. व विदेशी दारू कि. १,५००/–रू. असा एकुण ६१,५००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपीतांविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन सहा आरोपीला अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सहायक फौजदार राजेंद्र यादव मो.क्र. ८८८८८२१३९३ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री अजय चंदनखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक श्री मारूती मुळूक यांचे नेतृत्वात सपोनि. श्री. नागवे, पोलीस नाईक श्री. सुरेन्द्र वासनिक व पोलीस शिपाई श्री. अशोक निस्ताने यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर